# पुरूष प्रधान संस्कृति आणि नारी

२१ व्या शतकात मानवाने चमत्कारिक गोष्टी प्राप्त केल्या आहेत, परंतु काही क्षेत्रांमध्ये आज सुद्धा अपेक्षित परिवर्तन झालेले नाही. उदाहरणासाठी नारीची दशा आणि दिशाच घेऊया. आज सुद्धा तीच पिढीजात जुनी पुरुष प्रधान व्यवस्था आहे.

सत्ता राजनीतिक असो, आर्थिक असो, सामाजिक वा पारिवारिक, केंद्रस्थनी पुरूषच आहे, फलस्वरूप पुरूषाद्वारे नारीचे अनेक स्तरांवर शोषण होत आहे. तिला पीडित केले जात आहे. तिला विक्रीच्या साधनांच्या रूपात अश्लीलपणे जाहिरातींमध्ये प्रस्तुत केले जात आहे. बलात्काराच्या घटना सुद्धा नेहमीच्याच आहेत. छेडणे, ब्लॅकमेल करणे यासारख्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे.

अहंकारग्रस्त पुरुष जेव्हा सामाजिक व पारिवारिक जिम्मेदारी निभावित नाही तेव्हा महिलेला कठोर परिश्रम करून मुलांचे लालन-पालन, भरण-पोषणाची व्यवस्था करावी लागते. पुरूषांद्वारे निर्माण केल्या गेलेल्या या परिस्थितींमध्ये ती हीन भावनेने ग्रस्त होऊन घरातील अन्य महिलांबरोबर दुर्व्यवहार करते. नणंद-भावजय, सासू-सून, देवरानी-जेठानीची भांडणे जगजाहीर आहेत. हुंडयाची समस्या कमी होण्याऐवजी वाढतच जात आहे. अत्याधुनिक अल्ट्रा सोनोग्राफी टेस्टमध्ये लिंग परीक्षणाची सुविधा मिळाल्याने कन्या भ्रुण हत्यासारग्या घटनांचा आलेख वरती जात आहे. आपल्यावर होत असलेल्या अत्याचार, अन्यायापासून मुक्ती मिळविण्यासाठी नारीलाच पुढे यावे लागेल सार्थक समाधान करावे लागेल.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com